## विस्मरण

उठलोय मी नुकताच झोपेतून
काल खूप खूप ओझे घेऊन झोपलो होतो गाढ
अख्खा काळोख भरला होता माझ्या मेंदूत
आणि रक्तवाहिन्यांमधून धावत होते घोषणांचे ध्वनिहीन आवाज

कधीतरी मध्यरात्री जड झालेल्या पायांची
हालचाल करू शकलो मी
कधीतरी पहाटे पहाटे माझी जीभ हलवू शकलो मी
सकाळ होईस्तोवर माझे सगळे अवयव मंद गतीने पूर्ववत होत गेले
आणि एका अदृश्य भयस्वप्नातून
मी हळूहळू बाहेर येत गेलो

गेले कित्येक दिवस मौनाच्या भयंकर कोलाहलात
मी माझे विसर्जन करून घेतले होते
सैरभैर हिंडून हिंडून थकलो होतो मी प्रचंड
निषेधाचे झेंडे फडकावून फडकावून दुखावले होते माझे खांदे
आणि माझ्या हातापायाची नखे अक्राळविक्राळ वाढू पाहत होती
माझी संपूर्ण त्वचा कुठल्याशा समुद्री माशासारखी
घामानं खारट झाली होती
मात्र या विराट गर्दीतही माझे श्वास निराश्रित झाले नाहीत म्हणून सहीसलामत सुटलो मी

– पण मी पार विसरून गेलोय आज की
कोणत्या मोर्चात सहभागी झालो होतो मी?

**– पी. विठ्ठल,** नांदेड